# प्रेमयोग
# भक्तियोग
# कर्मयोग




**स्वामी विवेकानंद**

अनुवाद

**उज्ज्वला केळकर**



**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**प्रेमयोग, भक्तियोग, कर्मयोग :** स्वामी विवेकानंद
अनुवाद : उज्ज्वला केळकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
उज्ज्वला केळकर
१७६/२, 'गायत्री' प्लॉट नं.-१२
वसंतदादा साखर कामगार भवन जवळ, सांगली ४१६४१६
फोन नं. ०२३३-२३१००२० मो. नं. : ९४०३३१०१७०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३३०/-



# प्रेमयोग

## *प्रस्तावना*

विवेकानंद आपल्या काळातले चालता-बोलता विश्वकोश (एनसायक्लोपिडिया) होते. त्यांचे साहित्य वाचता वाचता लक्षात येते की, आपण ज्ञानसागरात गटांगळ्या खात आहोत. त्यांनी केवळ आपल्या देशाचाच इतिहास आणि तत्त्वज्ञान अभ्यासला असे नव्हे, तर जगभरातील देशांचे इतिहास आणि दर्शन यांचा अभ्यास केला आहे.

स्वामी विवेकानंदांनी जी विविध व्याख्याने दिली, त्यातील प्रेम आणि भक्तीशी संबंधित विचार इथे संकलित केले आहेत. प्रेमयोगात परमात्म्याबद्दल प्रेम प्रदर्शित करणे, प्रेममय होणे, याच्या आधी साधकाने जी पूर्वसाधना करायला हवी त्यावर भर दिलेला आहे. यात प्रेमाच्या महत्तेचे विस्तृत वर्णन आहे. पुस्तकात जशी प्रेमस्वरूप भक्तीच्या पैलूंची चर्चा केली आहे, तशीच प्रतिमा, प्रतीक, इष्ट इत्यादींची व्याख्या व त्यांचे स्पष्टीकरणही केले आहे. पूर्वभक्ती आणि पराभक्ती, आत्मा आणि परमात्मा यांच्याबद्दल तर्कपूर्ण विश्लेषण करत, त्यांनी सिध्द केलेय की, प्रेम, प्रेमिक आणि प्रेमास्पद म्हणजेच भक्ती, भक्त आणि भगवंत तीनही एकच आहेत.

✦✦✦

# अनुक्रमणिका


१. पूर्वसाधना ........................................................ ९

२. प्रेम : प्रथम सोपान ................................................ २०

३. भक्तीचे आचार्य .................................................. ३२

४. प्रतिमांची आवश्यकता ............................................ ४६

५. प्रतीकांचे भेद ..................................................... ५५

६. इष्ट.................................................................... ६७

७. पूर्वभक्ती आणि पराभक्ती ......................................... ७८


✦✦✦

# पूर्वसाधना

भक्त प्रल्हादाने केलेली खालील व्याख्या भक्तियोगाची सर्वोत्कृष्ट अशी व्याख्या आहे, असे मला वाटते.

**या प्रीतीरविवेकानां विषयेष्वनपायिनी।**
**त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसमर्पतु।।**

'हे ईश्वरा, अज्ञानी लोकांची जशी गाढ प्रीती इंद्रियभोग्य नाशवंत पदार्थांवर असते, त्याच प्रकारची प्रीती माझी तुझ्यावर राहो आणि तुझे स्मरण करताना माझे हृदय त्यापासून जराही दूर न हटो.'

आपण बघतो की, काही लोक इंद्रियभोग्य पदार्थांव्यतिरिक्त दुसरे काहीही जाणत नाहीत. धनधान्य, कपडालत्ता, पुत्र-पौत्र, बंधू-बांधव यावर त्यांचे आत्यंतिक प्रेम असते. आत्यंतिक आसक्ती असते. म्हणूनच या व्याख्येत भक्तराज प्रल्हाद म्हणतात, 'तशीच प्रबळ आसक्ती, तशीच दृढ संलग्नता, माझी केवळ तुझ्याविषयी राहू दे.' अशी प्रीती जेव्हा ईश्वराविषयी केली जाते, तेव्हाच तिला भक्ती म्हणतात. भक्ती कधी संहारक स्वरूपाची नसते. उलट ती आपल्याला शिकवते की, आपल्याला ज्या ज्या शक्तींची देणगी मिळालेली आहे, त्यातली कुठलीही शक्ती निरर्थक नाही, तर त्यांच्या साहाय्यानेच आपण स्वाभाविक रीतीने मुक्ती प्राप्त करून घेऊ शकू. भक्ती कुठल्याच वस्तूचा निषेध करत नाही. ती मानवी प्रवृत्तीच्या विरुध्द नेत नाही. ती या प्रवृत्तीला उन्नत करून आणि वळण देऊन अधिक वेगाने प्रवाहित करते. इंद्रियभोग्य विषयांवर आपली स्वाभाविक प्रीती असते. अशी प्रीती केल्याशिवाय आपण राहू शकत नाही, कारण हे विषय, हे पदार्थ आपल्याला अगदी सत्य असे प्रतीत होतात. यापेक्षा अधिक उच्चतर गोष्टींमध्ये आपल्याला स्वाभाविकता जाणवत नाही; पण जेव्हा व्यक्तीला या इंद्रिय जगताच्या पलीकडील सत्याचे अस्फुट का होईना, दर्शन होते, त्यावेळी देखील त्या व्यक्तीच्या ठिकाणी जी उत्कट आसक्ती असते, ती राहीलच, फक्त

ती इंद्रियविषयांना खिळवून न ठेवता, तिला वळवून ती या इंद्रियातीत वस्तूवर म्हणजेच ईश्वरावर जडवावयाची असते. जेव्हा इंद्रियभोग्य वस्तूंवर असलेले आपले पूर्वीचे प्रेम आपण ईश्वराला, त्या भगवंताला अर्पण करतो, तेव्हा त्या प्रेमाला भक्ती असे म्हणतात. रामनुजाचार्यांच्या मतानुसार, ते उत्कट ईश्वरप्रेम लाभण्यासाठी पुढीलप्रमाणे पूर्वतयारी करावी लागते.

ईश्वराविषयी उत्कट प्रेम लाभण्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट आहे, ती म्हणजे 'विवेक.' पाश्चात्त्यांना ही गोष्ट कदाचित विचित्र वाटेल. रामानुजाचार्यांच्या मतानुसार, त्याचा अर्थ आहे, 'आहारमीमांसा किंवा खाद्याखाद्य विचार.' आपल्या शरीर आणि मनात शक्ती निर्माण करणाऱ्या शक्तींचे निर्माण आपल्या भोजनातूनच होते. या साऱ्या शक्ती आपल्या भोजनाच्या आतच वसत असतात. त्या साऱ्या शक्तीच आपल्या शरीरात येऊन तिथे संचित होतात. त्याला निराळे रूप प्राप्त होते, एवढेच. आता मी जो कोणी आहे, तो यापूर्वी मी जे काही भोजन केले, त्या भोजनसामग्रीतच आहे. त्यापेक्षा भिन्न असे काहीही माझ्या शरीर वा मनात नाही. ज्याप्रमाणे या भौतिक जगातील जड पदार्थ आणि शक्ती ही आपले शरीर व मन बनतात, त्याप्रमाणेच आपण जे अन्न खातो, ते आणि आपले शरीर व मन यामध्ये केवळ बाह्य रूपाचाच फरक असतो. आपल्या अन्नाच्या प्रत्येक जडकणातून आपण आपल्या विचारांचे साधन वा उपकरण तयार करीत असतो व या प्रत्येक कणात वसत असलेल्या सूक्ष्म शक्तीपासून आपले विचार तयार होत असतात. तेव्हा ही गोष्ट सहज सिध्द होते की, आपले विचार व त्यांचे साधन वा उपकरण हे दोन्ही आपण जे अन्न खातो, त्याच्या अनुसारच बनत असतात. आपण खाल्लेल्या अन्नाचा त्यावर प्रभाव पडतो. काही विशेष प्रकारचा आहार आपल्या मनात विशेष प्रकारचे विकार उत्पन्न करतो. काही दुसऱ्या प्रकारचा आहार आपल्या शरीरावर दुसऱ्या प्रकारचा परिणाम करतो. तो आपल्या मनावरही परिणाम करतो. या साऱ्यातून आपल्याला एक अशी शिकवण मिळते की, आपण जी दुःखे भोगतो आहोत, त्याचे मूळ आपण केलेल्या भोजनात आहे. आपल्याला असे आढळून येते की, जडान्नाचे वाजवीपेक्षा जास्त सेवन झाल्यास आपल्याला आपल्या मनावर ताबा ठेवणे कठीण जाते. ते सारखे धावत राहते. तसेच, असे काही विशिष्ट खाद्यपदार्थ असतात की, ज्यांच्यामुळे मनःक्षोभ होतो. असे पदार्थ खाल्ल्यावर आपल्याला मनोनिग्रह करता येत नाही. बरेचसे मद्यप्राशन केल्यावर अथवा